**Government Of Maharashtra**
**महाराष्ट्र शासन**
**Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai**
**उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,**
**Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.**
**विकास सेटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.**
Tel.No. 25206199/25208182 Email: didicmumbai@gmail.com

दिनांक 12 DEC 2023

**मुंबई उपनगर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक २७.०९.२०२३ चे इतिवृत्त.**

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठित करण्याबाबत, शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. निप्रप-२०२०/प्र.क्र. २८/उद्योग-७, दि. १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आल्यानुसार मुंबई नगराकरीता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आल आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व निर्यातदारांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याकरीता तसेच जिल्ह्यातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन समिती परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरीता मुंबई उपनगर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७.०९.२०२३ रोजी दुपारी ०३.३० वाजता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, १० वा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई येथे संपन्न झाली.

सर्व प्रथम जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य सचिव, मा. उद्योग उप संचालक यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करून निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई उपनगर जिल्ह्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत तसेच मुंबई उपनगराकरीता एक जिल्हा एक उत्पादन प्रकरणी निर्यात प्रोत्साहनाकरीता तसेच निर्यात वाढीकरीता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच मागील इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना अग्रेषित केलेल्या अर्धशासकीय पत्रात नमुद मुद्यांबाबत कार्यवाहीचा अहवाल (Compliance Report) मा. अध्यक्ष यांना सादर केला. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

| अ.क्र. | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे तसेच मा.अध्यक्षांनी त्यावर दिलेले निर्देश |
|---|---|---|
| १. | लिडकॉम चे अधिकारी | • मुंबई उपनगर जिल्ह्यात Leather CFC करण्याचे प्रस्तावित आहे व त्यासाठी देवनार येथील जागेसंबंधी हस्तांतरण संदर्भात मागणी करण्यात आली.<br>• मा.अध्यक्षांनी, सदर जागा ही वादात असल्याने त्यास पर्यायी जागेचा विचार करावा व त्यासंबंधी मदत करण्याचे आश्वासित केले. |
| २. | Ernst & Young प्रकल्प सल्लागार | • निर्यात प्रोत्साहनाकरीता मा.विकास आयुक्त यांचे अर्धशासकीय पत्रात नमुद १० मुद्यांबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर केला. |

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

उद्योग उप संचालक (मुं.प्रा.वि.) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती.

मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती.

उपस्थित सभासदांची यादी खालील प्रमाणे:-

१. मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई.
२. उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई.
३. उद्योग अधिकारी (मुंप्रावि), जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई.
४. जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बैंक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, २ रा मजला, नटराज मार्केटसमोर, एस.व्ही.रोड, मालाड (पश्चिम), मुंबई.
५. संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई.
६. वरिष्ठ प्रकल्प सल्लागार, अन्स्र्ट अँड यंग एलएलपी, ५ वा मजला, ब्लॉक बी, निरलॉन नॉलेज पार्क, गोरेगांव, मुंबई.
७. संचालक, जेम्स अॅन्ड ज्वेलरी एक्सपोर्ट कौन्सील, ए-डब्ल्यू -१०१०, टॉवर-ए, जी ब्लॉक, भारत डायमंड हाऊस, वांद्रे-कुर्ला संकुल, बीकेसी रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
८. भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ), टाईम्स स्क्वेअर, युनिट क्रमांक ३-ए, बी विंग, ४ था मजला, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९.
९. संचालक, लेदर एक्सपोर्ट कौन्सिल, टार हब इमारत १, युनिट क्रमांक १०२, १ ला मजला, हॉटेल हयात रिजेन्सी जवळ आणि आयटीसी मराठा सहार आंतरराष्ट्रीय विमानतळ रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९९.
१०. लेदर इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कार्पोरेशन, ४५, ५ वा मजला, बॉम्बे लाईफ बिल्डींग, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई-४००००१.